तरुण भारत
Akola Main | 2022-12-05 | Page- 9
epaper.tarunbharat.net

# सायबर सुरक्षेवर कार्यशाळा

### गांधीग्राम येथील महात्मा गांधी विद्यालयाचा उपक्रम



सायबर सुरक्षा या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना तज्ज्ञ महिला

◆ **अकोला, ४ डिसेंबर**

गांधीग्राम येथील महात्मा गांधी विद्यालयात सायबर गुन्हे आणि सुरक्षा या विषयावर विद्यार्थ्यांसाठी एकदिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेत शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालयाच्या सायबर वॉरियर्स रोशनी वांडे आणि रेणुका नाळे यांनी विद्यार्थ्यांना सायबर गुन्हे झपाट्याने कसे वाढत आहेत, मोबाईल, लॅपटॉप, कॉम्प्युटर, इनरनेट, व्हॉट्सप, फेक वेबसाइट्सच्या माध्यमातून कशी फसवणूक होते आणि या पासून आपण कसे सुरक्षित राहावे या विषयी मार्गदर्शन केले.

भ्रमणध्वनी वापरताना त्याची पूर्ण तपासणी करावी, सुरक्षा प्रमाणपत्र असलेल्याच वेबसाईटला भेट द्यावी, समाज माध्यमाचा सुरक्षितपणे कसा वापर करावा याविषयीच्या सुरक्षा विषयक माहिती त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितली. यावेळी विद्यार्थ्यांनी विविध प्रश्न विचारून उत्स्पूर्त सहभाग नोंदवला. यावेळी सायबर सुरक्षेसाठी विध्यार्थ्यांना शपथ देण्यात आली आणि सुरक्षे बाबतचे माहितीपत्रक वितरीत करण्यात आले.या कार्यशाळेमध्ये, उपमुख्याध्यापक पटोकर यांनी ऑनलाईन गुन्ह्यांचे वाढते स्वरूप कमी करण्याच्या दृष्टीने विद्यार्थ्यांनी प्रयत्न करावा असे आवाहन केले. *(तभा वृत्तसेवा)*